276

महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक .२७/०२/२०२४

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-३६२३/प्र.क्र.५०/पोल-३ दिनांक २६ फेब्रुवारी, २०२४.

**विषय :-** पुणे शहर आयुक्तालयांतर्गत सीसीटीव्ही फेज-२ DPR-RFP ला मान्यता देणे व रु.४३८.२२ कोटी च्या खर्चास प्रशासकीय मान्यता देणे.

******

**परिपत्रक -**

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-३६२३/प्र.क्र.५०/पोल-३, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२४. ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४०२२६१४५११९०४२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

अपर पोलीस महासंचालक, (नियोजन व समन्वय), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस आयुक्त, पुणे शहर
पोलीस आयुक्त, पिंपरी-चिंचवड
कार्यासन अधिकारी, का.क्र. १७,

प्रत,

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके " वित्त व लेखा " या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

पुणे शहर आयुक्तालयांतर्गत सीसीटीव्ही फेज-२ DPR-RFP ला मान्यता देणे व रु.४३८.२२ कोटी च्या खर्चास प्रशासकीय मान्यता देणे.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण ३६२३/प्र.क्र.५०/पोल-३
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक
दुसरा मजला, मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक : २६ फेब्रुवारी, २०२४.

वाचा :

१. शासन निर्णय,गृह विभाग क्र. आयएसएस-१००९/प्र.क्र.३१३/विशा-४,दि.२७ जुलै,२०११.
२. पोलीस आयुक्त, पुणे यांचे पत्र क्र. प्रशा-६/सीसीटीव्ही कॅमेरा/७८४२/२०१२, दि.७.८.२०१२.
३. शासन निर्णय, गृह विभाग, क्र.आयएसएस-१०१२/प्र.क्र.७१/विशा-४, दि.१४.१०.२०१३
४. अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दि. ९.१०.२०२३ व दि.८.१.२०२४ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.
५. शासन निर्णय, सामान्य प्रशासन (माहिती तंत्रज्ञान) विभाग क्र. मातंसं-१७१६-३६१५/प्र.क्र.२८६/३९, दि.९.८.२०१६, दि.२०.३.२०१८, दि.९.५.२०१९, दि.५.१०.२०२३
६. शासन निर्णय, वित्त विभाग, महाराष्ट्र विनियोजन अधिनियम २०२३ दि.१२.४.२०२३.
७. शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.१०/२४/कोषा.प्रशा-५,दि.१४.२.२०२४
८. पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे पत्र जाक.क्र. प्रलि-३/पशा-६/सीसीटीव्ही प्रकल्प फेज-२ RFP/अनुदान/१८१, दि.३०.१.२०२४
९. गृह विभागाचे समक्रमांकाचे पत्र दि.१५.२.२०२४ चे पत्र.
१०. अपर पोलीस महासंचालक, (नि. व स.) यांचे पत्र क्र. पोमसं /१७ /पुणे शहर सीसीटीव्ही/३५/२०२१,दि.७.२.२०२४ व दि.२१/२/२०२४

प्रस्तावना :

पुणे येथे दि.१.८.२०१२ रोजी झालेल्या बॉम्ब स्फोटाच्या पार्श्वभूमीवर पुणे शहराच्या सुरक्षेच्या दृष्टीने सीसीटीव्ही यंत्रणा बसविणे गरजेचे होते. त्यानुषंगाने आवश्यक निविदा प्रक्रीया गृह विभाग, शासन निर्णय दि.२७.७.२०११ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीने पार पाडली असून अंतिम निविदा काराची निवड केली. पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे अधिनस्त पुणे व पिंपरी -चिंचवड शहरांमध्ये सीसीटीव्ही प्रकल्प राबविण्याबाबत मे. अलाईड डिजीटल सर्व्हीसेस लि. कंपनीला दि. १७.९.२०१३ रोजी इरादापत्र (Letter of intent) देण्यात आले होते. गृह विभाग, शासन निर्णय दि. १४.१०.२०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर प्रकल्पास व त्यासाठी येणाऱ्या रु. २२५ कोटी इतक्या रक्कमेच्या खर्चाच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली. पुणे व पिंपरी-चिंचवड शहर सीसीटीव्ही प्रकल्प दि.२७.१०.२०१५ रोजी कार्यान्वित (Go-Live) झाला आहे.

Scanned with CamScanner

२. पुणे शहर पोलीस आयुक्तालयांतर्गत सद्य:स्थितीत कार्यरत सीसीटीव्ही यंत्रणेचे Upgradation करुन त्यानुषंगाने प्रस्तुत यंत्रणेकरिता प्रकल्प राबविण्यासाठी सीसीटीव्ही प्रकल्प फेज-२ DPR-RFP मसुदा तयार करुन अंदाजे अपेक्षित खर्च रक्कम रु.४३८.२२ कोटी इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव दि.९.१०.२०२३ रोजीच्या उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीसमोर मान्यतेसाठी सादर केला होता. यावर अ.मु.स. (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली दि.९.१०.२०२३ रोजीच्या उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या बैठकीत मान्यता दिली आहे.

३. पोलीस महासंचालक कार्यालयाने दि.७/२/२०२४ च्या पत्रान्वये, पुणे शहर पोलीस आयुक्तालयांतर्गत सद्य:स्थितीत कार्यरत सीसीटीव्ही यंत्रणेचे Upgradation प्रस्तावित असल्याने प्रस्तुत यंत्रणेकरिता सीसीटीव्ही प्रकल्प फेज-२ DPR-RFP मसुदा तयार करुन अंदाजे अपेक्षित खर्च रक्कम रु.४३८.२२ कोटी इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्याबाबत कळविले.

४. पुणे शहर पोलीस आयुक्तालयांतर्गत सद्य:स्थितीत कार्यरत सीसीटीव्ही यंत्रणेचे Upgradation करुन त्यानुषंगाने प्रस्तुत यंत्रणेकरिता पुणे शहर पोलीस आयुक्तालयांतर्गत सीसीटीव्ही प्रकल्प फेज-२ DPR/RFP ला मान्यता देणे तसेच रक्कम रु.४३८.२२ कोटीच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याच्या प्रस्तावास दि.९.१०.२०२३ रोजीच्या उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीने मान्यता दिल्यानुसार प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. त्यानुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

## शासन निर्णय :

पुणे शहर पोलीस आयुक्तालयांतर्गत सद्य:स्थितीत कार्यरत सीसीटीव्ही यंत्रणेचे Upgradation करुन त्यानुषंगाने प्रस्तुत यंत्रणेकरिता पुणे सीसीटीव्ही प्रकल्प फेज-२ DPR-RFP मसुद्याला दि.९.१०.२०२३ रोजीच्या उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीने मान्यता दिली आहे. त्यानुसार पुणे शहर पोलीस आयुक्तालयांतर्गत सद्य:स्थितीत कार्यरत सीसीटीव्ही यंत्रणेचे Upgradation करुन त्यानुषंगाने प्रस्तुत यंत्रणेकरिता पुणे शहर पोलीस आयुक्तालयांतर्गत सीसीटीव्ही प्रकल्प फेज-२ DPR-RFP ला मान्यता देण्यात येत आहे. तसेच रक्कम रु.४३८.२२ कोटीच्या खर्चास या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. पुणे शहर परिक्षेत्रांतर्गत कार्यरत सीसीटीव्ही यंत्रणेचे अद्ययावतीकरण प्रस्तावित असल्याने त्याकरिता सीसीटीव्ही फेज-२ बाबत, वित्त विभागाच्या परिपत्रक दि.१४/२/२०२४ मध्ये नमूद प्रशासकीय मान्यता देण्यासंबंधी निर्बधातून सदर प्रकरणी शिथीलता देण्यात येत आहे. तथापि कार्यारंभ आदेश पुढील आर्थिक वर्षात देण्यात येतील या अटीवर सहमती देण्यात येत आहे.

२. यासाठी येणारा खर्च "मागणी क्र.बी-१०, ४०५५-पोलीस यावरील भांडवली खर्च, ८०० इतर खर्च, (००) (०९) सीसीटीव्ही संनियंत्रण यंत्रणा बसविणे (अनिवार्य) (४०५५ ०२२३) - ५२, यंत्रसामग्री व साधनसामग्री" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

३. हा शासन निर्णय, वित्त विभाग शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि.१७.४.२०१५ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८, भाग-पहिला, उपविभाग-दोन, महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम, १९६५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार व अ.क्र.२७ अ, नियम क्र.७६ अन्वये प्रशासकीय विभागाला असलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे. सदर



Scanned with CamScanner

शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांचे अनौपचारिक संदर्भ क्र.४२/२०२४ को.प्र.५, दि.२३/२/२०२४ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या WWW.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०२२६१४५११९०४२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

KAILAS ARJUN GAIKWAD

Digitally signed by KAILAS ARJUN GAIKWAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=b31abfcb1894c4c597cc944f19a89f474e7b98a708cc03eb46cd241a604d42bb, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=47D160717AE29C2D256185275D88934CFAE938938E65A27853145A4C04D865CD, cn=KAILAS ARJUN GAIKWAD
Date: 2024.02.26 15:00:01 +05'30'

( कैलास गायकडवाड )
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मुख्य सचिव, यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
४. मा. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
५. प्रधान सचिव (विशेष) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव (माहिती तंत्रज्ञान) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
७. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. पोलीस आयुक्त, पुणे शहर.
९. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड
१०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
११. अधिदान व लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
१२. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
१३. आयुक्त, पुणे महानगरपालिका.
१४. आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.
१५. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
१६. वित्त विभाग, व्यय-७/ वित्तीय सुधारणा कार्यासन, मंत्रालय, मुंबई
१७. कक्ष अधिकारी (अर्थसं-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
१८. निवडनस्ती, पोल-३.



Scanned with CamScanner